महाराष्ट्र पोलीस

ठाणे शहर

जा.क्र.ठाआ/आस्था२/३/पो.भ.२०१५-१६/2964/२०१७
पोलीस आयुक्त ठाणे शहर यांचे कार्यालय
दिनांक:07/१०/२०१७

संदर्भ :- महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११

विषय :-पोलीस शिपाई पदावर स्थानिक व तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती बाबत.
पोलीस भरती सन २०१५-१६.

----०००----

आदेश:

पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई यांची रिक्त पदे भरणेसाठी **सन २०१५-१६ मध्ये** पोलीस भरती घेण्यात आलेली आहे. सदर पोलीस भरतीमध्ये सामाजिक व समांतर आरक्षणानुसार निवड केलेल्या खालील नमूद पुरूष उमेदवार यांची रिक्त असलेल्या पोलीस शिपाई पदावर **दिनांक: ०६/१०/२०१७ रोजी पासून** खालील अटींवर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात येत आहे.

सदर नियुक्त केलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना ६ व्या वेतन आयोगातील सुधारीत वेतन संरचनेनुसार पोलीस शिपाई पदाची वेतनश्रेणी रू.५२००-२०२००/- + ग्रेड पे रू. २०००/- व विशेष वेतन रू. ५००/- (अधिक नियमानुसार अनुज्ञेय भत्ते) या वेतन संरचनेतील प्रारंभिक वेतन रू. ६४६०/- ग्रेड पे रू.२०००/- अनुज्ञेय होईल.

नियुक्त केलेल्या पोलीस शिपाई यांची नियुक्ती खालील नमूद अटी व शर्तीच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

१) सदरील नियुक्ती तीन वर्षाकरीता अस्थायी व तात्पुरत्या स्वरूपाची राहील. तसेच विहित परिक्षांमध्ये उत्तीर्ण होऊन प्रशिक्षण कालावधी यशस्वीरित्या पूर्ण करावा लागेल. जर विहित संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाला नाही तर त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

२) सामान्य प्रशासन विभाग यांचे कडील शासन निर्णय क्र. बीसीसी २०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६-ब दिनांक १२/१२/२०११ अन्वये नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर मागासवर्गीय उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करून घेणे बंधनकारक राहील. जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात आलेली असल्याने, जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास दिलेले नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यात येतील व महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचीत जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

३) याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकांवर मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. २५.८.११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय दिल्ली येथे एस.एल.पी. दाखल करण्यात आली आहे. यावर सर्वोच्च न्यायालयाकडुन जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधीन राहुन सदरची नियुक्ती देण्यात येत आहे.

४) चारित्र्य व वर्तणूकीबद्दलच्या पडताळणीसाठीचा साक्षांकन नमुना फॉर्म भरतांना त्यामध्ये नमुद केलेली माहिती खरी (सत्य) असली पाहीजे. खोटी माहिती भरून दिल्याचे पडताळणीमध्ये निदर्शनास आल्यास तसेच शैक्षणिक प्रमाणपत्रे व जातीचे दाखले/खेळाचे प्रमाणपत्रे व इतर प्रमाणपत्रे तसेच कोणतीही खोटी माहिती असल्याचे आढळल्यास अशा कर्मचाऱ्यांची सेवा कोणतेही कारण अथवा नोटीस न देता समाप्त करण्यात येईल.

५) प्रशिक्षण कालावधीत उमेदवारास कोणत्याही प्रकारची इजा अगर दुखापत झाल्यास, हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. अथवा उमेदवारास कोणतीही नुकसान भरपाई मिळणार नाही.

६) प्रशिक्षण कालावधीत उमेदवारात दोष आढळल्यास किंवा उमेदवारानी गैरवर्तणूक केल्यास तसेच पोलीस सेवेत स्वारस्य न दाखविल्यास/आढळल्यास किंवा प्रशिक्षण कालावधीत वरिष्ट अधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगी शिवाय गैरहजर राहील्यास सेवा समाप्त करण्यात येईल.

७) पदाचा राजीनामा दिल्यास पुनर्नियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

८) ज्या प्रवर्गातून/संवर्गातून पोलीस शिपाई पदी भरती करण्यात आले आहेत तो संवर्ग नंतर बदलता येणार नाही.

९) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील नियम ११ नुसार ठाणे शहर पोलीस घटकात पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झाल्यानंतर अन्य पोलीस घटकात कोणत्याही कारणास्तव आंतरजिल्हा बदली केली जाणार नाही.

१०) पोलीस शिपाई पदावर रूजु झाल्या तारखेपासुन तीन महिन्याचे आंत उमेदवाराने महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सीआर–१०७९/२०५९/२२३/११, दि.२०.११.८० नुसार विहित केलेले मत्ता व दायित्व बाबतचे विवरणपत्र स्वत:हून भरून संबंधित आस्थापनेस सादर करणे बंधनकारक आहे.

११) नियुक्त केलेल्या पोलीस शिपाई यांना महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अंनियो १००५/१२६/सेवा–४, मंत्रालय, मुंबई दिनांक ३१/१०/०५ अन्वये दि.०१ नोव्हेंबर २००५ किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेतील नियुक्तीनंतर "नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना" लागू ठरेल. त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे–अंशराशीकरण) नियम १९८४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

१२) निवड झालेल्या उमेदवाराचे बाबतीत शासन निर्णय क्र.अकंपा/१०००/प्र.क्र./२०/२०००/०८, दिनांक २८/३/२००१ अन्वये दिनांक ३१/१२/२००१ नंतर तिसरे अपत्य झालेल्या कर्मचा–यांस नियुक्तीसाठी पात्र समजले जाणार नाही.

१३) महाराष्ट्र शासन गृह विभाग पत्र क्र.पीएसबी–३११/प्र.क्र.५२१/पोल–५अ, दि.२६.९.११ व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील पत्र क्र.प्रशि/पोशि–भरती/प्रशि/खर्च वसुली/२०१२/२२३१, दिनांक २६/०४/२०१२ अन्वये नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांनी प्रशिक्षण कालावधीत अथवा त्यांचे प्रशिक्षण संपल्यानंतर तीन वर्षात पोलीस शिपाई पदाचा राजीनामा दिल्यास किंवा सदर पदावरून कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास त्या उमेदवाराकडुन त्यांना प्रशिक्षण कालावधीत आदा केलेले वेतन व भत्ते तसेच त्या उमेद्वारावर झालेला प्रशिक्षण कालावधीतील प्रशिक्षण खर्च प्रतिमहा रू.२०००/–प्रमाणे वसुल करून सरकारजमा करण्यात येईल. याबाबतचे हमीपत्र उमेदवाराने देणे बंधनकारक आहे.

१४) पोलीस शिपाई पदावरील नियुक्ती ही निव्वळ अस्थायी व तात्पुरत्या स्वरूपाची असल्याने महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग–१ मधील नियम क्रमांक ७८(१) (V)ते(VIII) मधील तरतुदीनुसार त्यांची सेवा केव्हाही समाप्त करण्यात येईल.

१५) महाराष्ट्र पोलीस सेवा प्रवेश नियम–२०११ मधील नियम १२ अन्वये नवप्रविष्ठ पोलीस शिपाई पदासाठी विहित केलेले मूलभूत प्रशिक्षण पूर्ण करावे लागेल व सदर प्रशिक्षणामध्ये घेण्यात येणारी परिक्षा चार संधीमध्ये उत्तीर्ण व्हावी लागेल. जर त्यांनी चार संधीमध्ये परिक्षा उत्तीर्ण केली नाही तर त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीमध्ये त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही.

१६) उमेदवार महाराष्ट्र शासन नियमानुसार मराठी भाषा परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

१७) महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ नियम १३ नुसार नियुक्ती दिलेल्या पोलीस शिपाई यांना मुंबई पोलीस शिक्षा व अपिले नियम १९५६ व मुंबई पोलीस अधिनियम १९५१ मधील नियम आणि तरतूदी तसेच शासनाने वेळोवेळी विहित केलेले अन्य नियम लागू होतील.

१८) उमेदवारास कर्तव्यावर रूजु होतेवेळी भारतीय राज्य घटनेतील संघराज्याशी एकनिष्ट राहण्याबाबत लेखी शपथ घेणे बंधनकारक राहील.

१९) अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील क्र. पोशि/पोभ/मार्गदर्शक/बृमुं/२०१०/३३, दिनांक २५/१/२०१० अन्वये चालक पोलीस शिपाई पदासाठी वेगळे सेवाप्रवेश नाही. पोलीस शिपाई पदामधूनच चालक पोलीस शिपाई यांची पदे भरणे आवश्यक आहे. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ मधील नियम ३(१)(ड) नुसार पोलीस शिपाई पदाच्या भरतीमध्ये पोलीस पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम २(२१) नुसार हलकी वाहने चालविण्याचा परवाना धारण केला असणे आवश्यक आहे. नियुक्तीच्या वेळी सदर परवाना धारण केलेला नसल्यास व पोलीस शिपाई पदात नियुक्तीनंतर पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वर्षाच्या आत वाहन चालविण्याचा परवाना धारण न केल्यास निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यात येईल. जर एखादया उमेदवाराने चालक पोलीस शिपाई पदाचे कर्तव्य नाकारले तर त्यांचा कुठल्याही पदासाठी नियुक्तीचा हक्क राहणार नाही. तसेच नियुक्ती दिलेल्या सर्वच उमेदवारांना चालक प्रशिक्षण देण्यात येऊन त्यांना चालकाचे कर्तव्यसुध्दा करावे लागेल.

२०) पोलीस शिपाई पदावर नियुक्ती दिल्यानंतर उमेदवारास उच्च शिक्षण अथवा इतर विभागात नियुक्तीसाठी परिक्षा दयावयाची असल्यास त्या परिक्षेस बसण्यासाठी कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

२१) पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र. पोमसं/६/१०/पोशि/भरती/सेवाज्येष्ठता/२५१/२०१२ दि.१७.८.२०१३ अन्वयेचा स्थायी आदेश क्र.२२१३ मधील तरतुदीनुसार सेवाज्येष्ठता निश्चित करण्यात येईल.

२२) नियुक्ती आदेशातील जे उमेदवार सध्या शासकीय/निमशासकीय सेवेत कार्यरत आहेत अशा उमेद्वारांनी त्यांच्या पूर्वीच्या सेवेचा राजीनामा मंजुरीबाबतचे आदेश किंवा कार्यमुक्तीचे आदेश या कार्यालयास सादर केल्यानंतरच त्यांना या आस्थापनेवर हजर करून घेण्यात येईल.

२३) नियुक्तीसाठी पात्र ठरविण्यासाठी आवश्यक त्या बाबींची फेरतपासणी केल्यास किमान विहित पात्रता आढळून येणे आवश्यक आहे. तसे नसल्यास कोणतेही कारण अथवा नोटीस न देता सेवा समाप्त करण्यात येईल.

२४) खालील नमूद उमेदवार यांनी सदरचे आदेश प्राप्त होताच तात्काळ राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय ठाणे शहर येथे हजर रहावे. हजर न झालेल्या उमेदवारांची झालेली निवड आपोआप रद्द होईल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | चेस्ट नंबर | उमेदवाराचे पूर्ण नाव | महिला/पुरूष | प्रवर्ग | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|
| १ | १५११५ | धुळप्पा हरी सलगर | पुरूष | भज—क | सर्वसाधारण |
| २ | ९१४७ | तुषार पांडुरंग निरगुडे | पुरूष | इ.मा.व. | होमगार्ड |
| ३ | २५९६ | पवन सिध्दार्थ तायडे | पुरूष | अ.जाती | सर्वसाधारण |
| ४ | ८७१८ | भैय्यासाहेब नामदेव गायकवाड | पुरूष | अ.जाती | सर्वसाधारण |
| ५ | १३१२ | बाळू तानाजी वाघमारे | पुरूष | अ.जाती | सर्वसाधारण |
| ६ | १००७९ | विजय कैलास निकम | पुरूष | अ.जाती | सर्वसाधारण |
| ७ | १५१८५ | मयूर निंबा बर्वे | पुरूष | अ.जाती | सर्वसाधारण |

(डॉ.प्रियंका नारनवरे)
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय—१
पोलीस आयुक्त कार्यालय, ठाणे शहर

प्रति,

वरील सर्व संबंधित उमेदवार यांना.

प्रत:– १.सहा.पोलीस आयुक्त, मुख्यालय, ठाणे शहर.

२.राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय, ठाणे शहर.

२/– उपरोक्त आदेशाच्या अनुषंगाने नवप्रविष्ट पोलीस शिपाई यांना पोलीस मुख्यालयात हजर करून त्यांची नोंद आपल्या हजेरी पटावर करावी. नप्रशि यांना सर्व किट सरंजाम किट पेटीसह अदा करावा. तसेच त्यांना स्टेट बँक/एचडीएफसी बँकेत खाते उघडुन खाते नंबर लेखा शाखेत सादर करण्याची समज दयावी.

३.कार्यालय अधीक्षक,लेखा शाखा ठाणे

२/– शासन निर्णय क्र.अंनियो १००५/१२६/सेवा–४, मंत्रालय, मुंबई दिनांक ३१/१०/०५ अन्वये दि.०१ नोव्हेंबर २००५ नंतर शासकीय सेवेत नियुक्ती झाल्याने त्यांचे नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना अंतर्गत विहित नमुन्यातील फॉर्म त्वरीत भरून घ्यावेत. तसेच वरील सर्व नप्रशि यांची बँक खाते क्रमांक प्राप्त करून घ्यावेत.

४.१ ए.एस. पोलीस पत्रक प्रसिध्दीसाठी

५.आस्थापना शाखा २/२

६.प्रभारी अधिकारी, सायबर सेल

२/– वर नमुद नियुक्ती आदेश www.thanepolice.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात यावेत.

| पोलीस शिपाई पदी नियुक्ती आदेश देण्यात आलेल्या उमेदवारांसाठी सुचना |
|---|
| १.नियुक्ती दिलेल्या उमेद्वारांनी मेसकरीता रू.५०००/– अॅडव्हॉन्स भरणे आवश्यक असल्याने सदरची रक्कम येताना सोबत आणणे आवश्यक आहे. |
| २.हजर होणाऱ्या उमेदवारांनी त्यांच्या दैनंदिन वापरासाठी आवश्यक असलेले साहित्य उदा. गरजेनुसार आवश्यक असलेले वापरावयाचे कपडे, बाड–बिछाना, जेवणासाठी ताट,वाटी,तांब्या, बादली व मग इ. साहित्य सोबत आणावे. |
| ३.नप्रशि यांचे बँक खाते,डी.सी.पी.एस.खाते तसेच सेवापुस्तक उघडणेसाठी 30 x 30 mm या साईजचे स्वत:चे ८ फोटो सोबत आणावेत. |